**एम.ए.सी.पी.क्र.०९/२०२३**
**उज्वला विरुध्द नामदेव**
**नि.क्र.४१**

**उलटतपास गैरअर्जदार क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. दिवाण**

२. निवळी पासून मुरुड हे अंदाजे ११ कि.मी. वर आहे. जिथे घटना घडली तेथे अंधार होता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष अपघात बघीतला नाही. धडक देणा–या वाहनाचा क्रमांक मी अपघाताच्या दिवशी बघीतला होता. सदर क्रमांक मी अपघाताच्या दिवशी पोलिसांना सांगितला नाही. मी घटनास्थळावर २० मिनिटे हजर होतो. मी जखमीला दवाखाण्यात पाठवण्यासाठी १०८ क्रमांकावर फोन केला होता पण मी त्यांच्यासोबत गेलो नाही. त्याठिकाणी जखमीचे नातेवाईक आले नव्हते. जखमीला माझ्या समक्ष दवाखाण्यात नेण्यात आले. मी दुस–या दिवशी स्वत:हून पोलिस स्टेशनला जावून अपघाताची माहिती दिली नाही. सदर व्यक्ती मयत झाल्याबाबत मी कोणाशीही चर्चा केली नाही. अपघाताच्या वेळी जखमीची ओळख पटवण्यासाठी मी कोणतेही ओळखपत्र पाहिले नाही. पोलिसांनी माझा बयान घेतला नाही. पोलिसांनी मला कधीच पोलिस स्टेशनला बोलावले नाही. मी धडक देणारी गाडी अपघातानंतर पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत कोणतीही प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर हा मी पोलिसांच्या सांगण्याप्रमाणे चुकीचा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, एम.एच.२४ ए.एस. ७५१८ ही गाडी चुकीच्या पध्दतीने प्रस्तुत अपघातात गोवण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गाडीने कोणताही अपघात झाला नाही व मयताला धडक देण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला प्रस्तुत

प्रकरणामध्ये खोटा साक्षीदार म्हणून गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला मदत करण्याकरीता मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास – पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by ANANT KISHOR DESHMUKH
Date: 2026.07.22 17:08:09 +0530

**(ए.के.देशमुख)**

पदसिध्द सदस्य

दि.२२.०७.२०२६ मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर.